Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक २७ • Title - Code :- MAHMAR4951 • शनिवार दि.१४ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सलाम महाराष्ट्र पोलिसांना !

## हरवलेल्या १९ हजारपेक्षा जास्त मुली, महिलांना परत मिळविण्यात महाराष्ट्र पोलिसांना यश

**वरोरा । प्रतिनिधी**

राज्यात ०५ महिन्यांत २९ हजार मुली व महिला बेपत्ता झाल्याचे वृत्त विविध माध्यमांतून प्रसारीत झाले आहे. पण, पोलीस विभागामार्फत प्राप्त माहितीनुसार यात तथ्य नसल्याचे दिसून आले आहे. राज्यात यावर्षी मे, २०२३ पर्यंत अपहरण झालेल्या मुलींपैकी ६८.९३ टक्के मुली परत मिळाल्या असून हरविलेल्या महिलांपैकी ६३.१० टक्के महिला परत मिळाल्या आहेत, अशी माहिती महाराष्ट्र पोलीस विभागाच्या महिला व बाल अपराध प्रतिबंध शाखेने दिली आहे.

राज्यातील विविध पोलीस स्टेशनमध्ये मुली व महिला हरवलेल्याच्या नोंदी घेण्यात येतात. मात्र पोलीस प्रशासनाने केलेल्या तपासाअंती जानेवारी ते ऑगस्ट २०२३ दरम्यान हरवलेल्या २९ हजार ८०७ महिलांपैकी १९ हजार ८९ महिला घरी परतल्या आहेत. त्याचप्रमाणे जानेवारी ते ऑगस्ट २०२३ दरम्यान अपहरण झालेल्या




५ हजार ४९५ मुलींचा शोध घेण्यात आला आहे. मुली व महिला हरविल्याच्या तुलनेत त्यांचा शोध घेऊन घरी

**राज्य शासन महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करीत आहे. राज्याचा गृह विभाग महिलांच्या सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवित आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी गृह विभाग कटिबध्द आहे.**

परतण्याचे प्रमाण अधिक आहे. महिला, मुली हरविल्याची तक्रार नोंद झाल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी महिलेचा कसून शोध घेतात. तपासासाठी आवश्यक पर्यायांचा उपयोग करीत महिलेला शोधून घरापर्यंत आणण्यात येते.

## झाडीबोली साहित्य मंडळाचा वर्धापन दिन साजरा




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

येथील झाडीबोली साहित्य मंडळ शहर शाखेच्या वतीने नुकताच झाडीबोली साहित्य मंडळाचा वर्धापन दिन दाताळा येथील संत खप्तीनाथ महाराज मंदिर सभागृहात संपन्न झाला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर होते. प्रमुख अतिथी म्हणून नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक संदीप कटकूरवार, कवी नामदेव गेडकर, बंडू टेकाम, डॉ. धर्मा गावंडे, कार्तिक चरडे, कवयित्री रोहिणी मंगरूळकर , सुनिल इखारे, मंजूषा खानेकर, मंदिराचे व्यवस्थापक पांडे उपस्थित होते. सुरुवातीला राष्ट्रसंताच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर मंडळाचे ज्येष्ठ सदस्य तथा लेखक दिवं. यवनाश्व गेडकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.प्रास्ताविकात प्रा.नामदेव मोरे यांनी शाखेच्या संघटन कार्यासंबधी विचार व्यक्त केले. नामदेव गेडकर यांनी दिवंगत यवनाश्वजी गेडकर यांच्या आठवणी सांगत त्यांच्या साहित्य लेखनावर प्रकाश टाकला.कविसंमेलन सत्रात कवी शिवशंकर घुगुल, सुनिल इखारे, रोहिणी मंगरूळकर, मंजुषा खानेकर आदींनी स्वरचित कविता ऐकविल्या तर बंडू टेकाम व कार्तिक चरडे यांनी राष्ट्रसंताची भजने प्रस्तुत केले.कार्यक्रमाध्यक्ष बोढेकर यांनी झाडीबोलीचा वर्धापनदिन, संस्थापक डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांचे साहित्य तसेच शाखेच्या वतीने पुढे होणाऱ्या विविध उपक्रमासंबधाने विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नामदेव मोरे यांनी केले तर आभारप्रदर्शन धर्मा गावंडे यांनी केले.

## कृषीकन्यां द्वारे सुर्ला येथे आंतर राष्ट्रीय तृणधान्य वर्ष साजरे

**वरोरा । प्रतिनिधी**

आपल्या दैनंदिन आहारामध्ये विविध प्रकारचे धान्य, भाज्यांचा समावेश असतो. यामध्येच तृणधान्ये एक महत्वाचा आहारातील घटक आहे. तृणधान्यांच्या सेवनामुळे आपल्याला विविध प्रकारच्या रोगांपासून संरक्षणाची ताकद मिळते. यात असणारे योग्य ते पौष्टिक घटक शरीरासाठी अत्यंत महत्वाचे असतात. लोकांमध्ये तृणधान्यांनबद्दल जागरुकता निर्माण होण्यासाठी २०२३ हे आंतरराष्ट्रीय तृणधान्य (भरडधान्य) वर्ष म्हणून साजरे केले जात आहे.या निमित्ताने आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या सातव्या सत्राच्या विद्यार्थीनींनी जि. प. प्राथमिक शाळा सुर्ला येथे तृणधान्य महोत्सव साजरा केला.यामध्ये त्यांनी गावकर्यांना विविध तृणधान्याचे नमुने दाखवले तसेच त्यांच्याविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमाला जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका,




शाळेतील विद्यार्थी व अन्य गावकर्यांनी उपस्थिती दर्शविली. कृषिकन्यांनी गावकर्यांना तृणधान्यांचे महत्व पटवून दिले.आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार , कार्यक्रम प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन , कार्यक्रम समन्वयक डॉ. एस.पंचभाई , डॉ. अश्विनी मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सातव्या सत्रातील विद्यार्थीनी श्रुती पांडे, प्रणाली नेमाडे, हर्षदा मेंढे, राजश्री कोळसे, सुनिता खोकले व ऋतुजा खडसे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

## शिवसेना (उबाठा) वतीने भद्रावती तालुक्यात होऊ द्या चर्चा कार्यक्रम

### जिल्हाप्रमुख जिवतोडे यांच्या नेतृत्वात सरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड

**भद्रावती । प्रतिनिधी**

शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वतीने गावागावात सरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड करण्यासाठी होऊ द्या चर्चा कार्यक्रम जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या नेतृत्वात राबविण्यात येत आहे. तालुक्यातील धानोली, पावना व पेवर या गावात चंद्रपूर जिल्हा वक्ते ओमराजे खानविलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत फसव्या योजनांचा भांडाफोड कार्यक्रम राबविण्यात आला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात वरोरा - भद्रावती विधानसभेतील प्रत्येक गावा गावात सरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड करण्यासाठी होऊ द्या चर्चा करूया बोलवेड्या कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तालुक्यातील धानोली, पावना व पेवर या गावात शिवसेनेचे चंद्रपूर जिल्हा वक्ते ओमराजे खानविलकर



यांच्या प्रमुख उपस्थितीत व जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात गावकऱ्यांशी संवाद साधून काळा पैसा भारतात आला का, १५ लाख रुपये बँक खात्यात आले का, सर्वांना पक्की घरे मिळाली का, बेरोजगारांना नोकरी मिळाली का, पेट्रोल-डिझेलचे भाव कमी झाले का, नवीन उद्योगधंदे आले का, महागाई कमी झाली का, घरगुती गॅसवरील सबसिडी बंद का केली, असे अनेक प्रश्न विचारत 'होऊ द्या चर्चा अभियानांतर्गत सरकारच्या फसव्या योजनांचा भांडाफोड करण्यात आला. यावेळी उपजिल्हा प्रमुख अमीत निब्रड, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, युवासेना उपजिल्हा प्रमुख महेश जीवतोडे असंख्य स्थानिक नागरिक व शिवसैनिक उपस्थित होते.

## ढोल ताशांच्या गजरात ना.सुधीर मुनगंटीवार यांचे उपराजधानीत स्वागत

## भारत-पाकिस्तान सिमेवर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने दुमदुमला नागपूर विमानतळ परिसर







**नागपूर : अफजल खानाचा कोथळा बाहेर काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांची वापरलेली वाघनखं लंडनहून भारतात आणण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वर्धा पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचे उपराजधानीत ढोल-ताशांच्या गजरात भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. चंद्रपूर, वर्धा, नागपुरातील भाजप कार्यकर्ते व शिवभक्तांच्या गर्दीने यावेळी नागपूर विमानतळाचा परिसर फुलुन गेला होता.**

विमानतळावर जमलेल्या कार्यकर्त्यांनी यावेळी ना. मुनगंटीवार यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा, पेशवेकालीन टोपी, शाल-श्रीफळ आदी वस्तू भेट देत त्यांचा सत्कार केला. आनंदी कार्यकर्त्यांनी व शिवभक्तांनी ना. मुनगंटीवार यांना पेढे भरवत जल्लोष साजरा केला. यावेळी आमदार पंकज भोयर ,आश्विनी जिचकार, भाजपा प्रदेश सचिव राजेश बकाने,वर्धा भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, बंटी (जीतेंद्र) कुकुडे भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष नागपूर, विष्णू चांदे महानगर संघटन मंत्री नागपूर,बादल राऊत भाजयुमो महानगर जिल्हाध्यक्ष नागपूर,चंद्रपूरच्या माजी महापौर राखी कंचर्लावार, माजी भाजपा महानगर अध्यक्ष चंद्रपूर डॉ.मंगेश गुलवाडे,निलेश किटे, सुभाष कासनगोटूवार,ब्रीजभूषण पाझारे, जयंत कावळे, राजू मुक्कावार,सचिन बोगावार, स्वप्नील कलुरवार आदींनी स्वागत केले.यावेळी बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं आणण्यासाठी सामंजस्य करार करण्यासाठी व येत्या काळात भारतात आणण्याचे सौभाग्य आपल्याला प्राप्त झाले. त्यामुळे आपण स्वत:ला अत्यंत भाग्यवान मानतो. वाघनखांसह महाराजांची जगदंबा तलवार आणि लंडनच्या संग्रहालयातील महाराष्ट्राच्या वारसाची साक्ष देणाऱ्या इतर वस्तुही लवकरच भारतात येण्याकरीता आपण पूर्ण प्रयत्न करू असा विश्वासही ना. मुनगंटीवार यांनी ठामपणे व्यक्त केला. लंडन आणि जपानचा दौरा आटोपल्यानंतर आपण भारतात परतलो त्यावेळी आपले भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. शिवभक्तांच्या या प्रेम आणि आपुलकीने आपण भारावलो आहोत. हा क्षण आपण आयुष्यात कधीही विसरू शकत नाही, असे ना. मुनगंटीवार यांनी नमूद केले.

### भारत-पाक सिमेवर महाराजांचा पुतळा उभारणार



**आम्ही पुणेकर या संस्थेने श्रीनगरातील कुपवारा जिल्ह्यात भारत-पाकिस्तान सिमेजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचा प्रस्ताव दिला आहे. महाराष्ट्र शासन त्यांना यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार आहे. सिमेवर हा पुतळा उभारण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पाकिस्तानला हा पुतळा पाहुनच धडकी भरेल, असे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी ठामपणे नमूद केले.**

# ऑनलाइन खरेदीचे मायाजाल

**मोबाईलचा वापर वाढल्यापासून ऑनलाईन बाजारपेठेतील वस्तू खरेदी करण्याची सवय अनेक ग्राहकांना लागलेली आहे. परंतु ऑनलाईनपेक्षा स्थानिक बाजारपेठेतील खरेदीतून अनेक फायदे असल्याने ग्राहकांनी कुठल्याही वस्तू खरेदी करताना स्थानिक बाजारपेठेतील वस्तूखरेदीला प्राधान्य दिले पाहिजे, यातूनच गावाची प्रगती होऊ शकते.**



जे वाचले ते

डॉ.यशवंत घुमे
९८२२२३३९१२


कल्पवृक्षाची गोष्ट आपण सगळ्यांनी वाचली असेल. कल्पवृक्षाच्याखाली बसून जो कोणी आपल्या मनातील इच्छा व्यक्त करायचा ती लगेच पूर्ण होत असल्याचे ऐकले आणि वाचले आहे. कल्पवृक्ष म्हणजे मनातील ईच्छा पूर्ण करणारे झाड. प्रत्यक्षात ते होते की केवळ दंतकथाच आहे हा वादाचा विषय आहे. परंतु कल्पवृक्षाच्या बरोबरीचे मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी सदैव तत्पर असलेले साधन आज आपल्याकडे उपलब्ध आहे. ते म्हणजे मोबाईल.आपल्या सगळ्यांच्या हातातील मोबाईल एखाद्या कल्पवृक्षापेक्षा कमी नाही. कल्पवृक्षापेक्षाही दोन पावले पुढेच आहे हे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही.गेल्या दशकापासून मोबाईलचा वापर घराघरांत मोठ्या प्रमाणात वाढला. कधीकाळी केवळ श्रीमंतांच्याच जवळ असणारा मोबाईल आता सर्वसामान्य लोकांच्या घराघरांत आणि खिशात कधी पोहचला कळालेच नाही. इतका त्याचा प्रवेश सहजमान्य झाला आहे. कधीकाळी भौतिक सुविधा म्हणून ज्याच्याकडे बघितले जायचे तो आता आयुष्यातील गरज झाला आहे. या मोबाईलने सर्वांनाच इतके वेड लावले आहे की, एकवेळ जेवण मिळाले नाही तरी चालेल. परंतु मोबाईल हातचा सुटत नाही. मोबाईल हा प्रत्येकाचा श्वास झाला आहे. कोविड महामारीच्या काळात तर मोबाईलचा वापर परमोच्च शिखरावर पोहोचला. बाहेर संचारबंदी असताना अनेकांनी मोबाईलचा आधार घेत कोरोनाकाळ काढला. बालकांपासून तर पालकांपर्यंत मोबाईलने जणू काही एखाद्या कल्पवृक्षाप्रमाणे सगळ्यांच्या मनातील इच्छापूर्ती केली. मोबाईलवर संपर्क केला की लगेच इच्छित वस्तू समोर उभी राहायची. आजही तुम्ही मनात काही विचार आणा लगेच तुमच्यासमोर मोबाईल तुमची इच्छा पूर्ण करतो. इतके आपण त्याच्या अधीन झालो आहे. मानवाची एक मूलभूत गरज बनला आहे. सुखसोयी उपभोगण्याचे साधन बनला आहे. पूर्वी घरातील सगळी मंडळी बाजारात जाऊन इच्छित वस्तू खरेदी करायची. परंतु आता ऑनलाइन मोबाईलच्या सहाय्याने मनचाही वस्तू खरेदी करता येते, तेही बाजारात न जाता, घरच्याघरी इच्छीत वस्तूंचा ऑर्डर देता येतो. मोबाईल ग्राहक आणि विक्रेत्यांसाठी अतिशय उपयुक्त वस्तू ठरला आहे. मोबाईलने खरेदी करणे कोणालाही गैर वाटत नाही. कारण मोबाईलच्या माध्यमातून वस्तू खरेदी करता येत असल्यामुळे खरेदी करण्यासाठी रांगा लावायची गरज नाही. खरेदीसाठी दूरवर बाजारात जायची गरज नाही. बाजारातील दुकानांप्रमाणे वस्तू स्टोअर असणे आवश्यक नाही. अनेक प्रकारच्या वस्तूंचे पर्याय शोधणे सोपे झाले आहे. ऑनलाइन खरेदीचे व्यवहार सतत २४ तास सुरू असतात त्यामुळे मनातील वस्तू वाटेल तेव्हा कधीही खरेदी करता येते. सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मनातील इच्छित वस्तू लगेच




तिच्या किमतीसह पाहता येते. तुलना करता येते. अधिकाधिक चांगल्या दर्जाच्या वस्तू शोधणे सोपे झाले आहे.दुकानात जसा जागेचा तुटवडा असतो तसा इथे नसल्यामुळे अनेक वस्तू सहज बघता येतात. खरेदीमध्ये गोपनीयता पाळता येते. खिशात पैसे ठेवायची गरज नाही. कंपन्यांचे अतिजलद, वेगवान आणि कार्यक्षम व्यवहार असल्याने लगेच घरपोच वस्तू मिळतात. बाजारात जाण्याच्या खर्च व शारीरिक मेहनत कमी होते. हे फायदे असले तरी ऑनलाईन खरेदीचे काही तोटेसुध्दा आहेत हेही ग्राहकांनी लक्षात घेतले पाहिजे. एखादी वस्तू ऑनलाइन बोलवल्यानंतर तिचा वापर करण्यास योग्य आहे की नाही याची चाचणी घेण्यात समर्थ नसते. ऑनलाईन खरेदी करताना दुकानांप्रमाणे वैयक्तिक संबंध येत नसल्यामुळे विश्वसनीयता सांगता येत नाही.अनेकदा फसवणूक होण्याची शक्यता असते.बनावट बिल, बनावट माल माथी मारल्या जाऊ शकते. वैयक्तिक बँक खात्यातील डिटेल्स माहिती हॅक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या खरेदीसाठी पूर्णपणे ऑनलाईन इंटरनेटवर अवलंबून राहावे लागते. खिशातून प्रत्यक्ष पैसे जात नसल्यामुळे मोबाईलच्याद्वारे खरेदी करताना अनेकदा आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी केली जात असल्याने आर्थिक झळ बसते. ती वस्तू पसंत आली नसल्यास परत करताना अनेक मानसिक गोष्टींचा त्रास सहन करावा लागतो. उत्पादन प्राप्त करण्यासाठी बाजारपेठेपेक्षा थोडी जास्त वाट बघावी लागते. ऑनलाइन खरेदी ही एकीकडे फायदेशीर आणि उपयुक्त प्रक्रिया असली तरी तिचे अनेक गैरफायदेही आहेत .तेव्हा ग्राहकांनी कुठल्याही वस्तू खरेदी करताना एखाद्या गोष्टीची जशी फायदे असतात तसे नुकसानही गृहीत धरून सकारात्मक, नकारात्मक बाबींवर विचार केला पाहिजे. ऑनलाइन शॉपिंगचा आपल्याला कोणता फायदा झाला. कोणता तोटा झाला. हे ठरवून पुढील व्यवहार कोणत्याप्रकारे करायचे याचा निर्णय घेतला पाहिजे. कारण ऑनलाईन खरेदी ही दुधारी शस्त्राप्रमाणे आहे. तिचे जसे काही फायदे आहेत, तसेच नुकसानही आहे. विशेषतः स्थानिक बाजारपेठेला ऑनलाईन खरेदीचा मोठ्या प्रमाणात फटका बसत असल्याने स्थानिक बाजारातील वस्तूंची विक्री पूर्वीसारखी राहिली नाही. त्याची झळ स्थानिक दुकानदारांना आर्थिकदृष्ट्या सोसावी लागत आहे. अनेक सण आणि उत्सव साजरे करताना जर स्थानिक बाजारपेठेतून व दुकानदारांकडून वर्गणीची अपेक्षा करतो. स्थानिक गावाचा विकास व्हावा अशी स्वप्ने पाहतो तर गावातील बाजारपेठेची भरभराट होणे नितांत आवश्यक आहे. गावातील पैसा गावातच राहिला पाहिजे तो बाहेर जाता कामा नये. कधीही सुखदुःखाच्या प्रसंगी गावातीलच दुकानदार आपल्याला साथ देणार आहे. उधारीची आवश्यकता पडल्यास उधार देणार आहे.ऑनलाइनचे व्यवहार कितीही पटीने केले तरी ते भल्याचे ठरणार नाही. आपल्या गावातील व्यापारी जगला पाहिजे. एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ या म्हणीप्रमाणे प्रत्येकाने ऑनलाइनपेक्षा स्थानिक बाजारपेठेला प्राधान्य दिल्यास गाव प्रगतीच्या दिशेने गेल्याशिवाय राहणार नाही. गावातील ओळख ही सर्वांसाठी उपयुक्त व फायदेशीरच ठरणार आहे, नात्यात गोडवा आणणार आहे. गावाचे भले तर आपलेही भले ही भावना ठेवून ऑनलाईनपेक्षा स्थानिक बाजारपेठेला महत्त्व दिले तर गावातील पैसा गावातच राहील नाही का?

# ‘झाडीबोली चळवळीचे सिंहावलोकन’ म्हणजे साहित्यसेवाच

झाडीबोली नावाची एक बोली महाराष्ट्र राज्याच्या ईशान्य दिशेला असलेल्या काही भागात बोलली जाते. महाराष्ट्राच्या भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांचा भूभाग 'झाडीमंडळ' किंवा ' झाडीपट्टी' या नावाने ओळखला जातो. या प्रदेशात बोलली जाणारी बोली 'झाडीबोली' या नावाने प्रचलित आहे. आज या चार जिल्ह्यांशिवाय या जिल्ह्यांच्या उत्तर व पूर्व सीमेवरील मध्य प्रदेशातील बालाघाट, दुर्ग व राजनांदगाव या जिल्ह्यांचा काही भाग आणि भंडारा व चंद्रपूर पश्चिम सीमेवरील नागपूर जिल्ह्याचा काही भाग झाडी भाषिक प्रदेश म्हणून समावेश करावा लागतो. आज साधारतः ६२ लक्ष लोक झाडीबोली बोलतात. अशा या विकसित झालेल्या बोलीभाषेविषयी यश प्रिंटर्स, सडक पिंपळगाव ता. लाखनी जि. भंडारा यांनी प्रकाशित केलेले ग्रामगीतार्य बंडोपंत बोढेकर लिखित 'झाडीबोली चळवळीचे सिंहावलोकन' हे संकलन म्हणजे वाचकांसोबत, अभ्यासकांकरिता आणि समीक्षकांना एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगी पडणारी एक साहित्यसेवा आहे. सदर ग्रंथ झाडीबोलीचा प्रथम उद्घोष केलेल्या दिनांक, ठिकाणापासून म्हणजे १९९१ पासून तर २०१७ पर्यंत झाडीबोली विकासासाठी ज्या ज्या चळवळी राबविण्यात आल्या त्या चळवळीचे ठिकाण, दिनांक व अध्यक्ष व मुख्य अतिथींच्या नावांची नोंद केली आहे. त्यामुळे सदर पुस्तिका ही झाडीबोलीच्या अभ्यासकांना, इतिहासकारांना ऐतिहासिक दस्तावेजच म्हणावा लागेल.लेखक ग्रामगीताचार्य बडोपंत बोढेकर यांची स्वतःची बोलीभाषा झाडीबोली असल्याने त्यांना आपल्या भाषेचा अभिमान आहे. म्हणूनच झाडीबोलीचे अध्वर्यु डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी आपले बोटावर मोजण्याइतके मित्र घेऊन उभारलेली चळवळ आज अक्षरशः महादेवाच पोहा तयार झाला, असे लेखक आपल्या मनोगतात म्हणतात. लेखकाने झाडीबोलीचा विस्तार करण्यासाठी संपूर्ण झाडीपट्टीत ७० शाखांची निर्मिती केली. या शाखांच्या माध्यमातून काव्यसंमेलने, झाडीबोली साहित्य संमेलने, कथा संमेलने, विविध विषयांवर काव्यलेखन स्पर्धा, नाट्य संमेलने आदी उपक्रम सातत्याने आजतागायत राबवित आहेत. त्यामुळे अनेक साहित्यिक मंडळी जुळल्या गेली आहेत. अनेक नवोदित लेखक, कवींना, नाट्यकलावंतांना व्यासपीठ प्राप्त झाले आहे. अनेक लेखक, कवींच्या पुस्तकांची, काव्यसंग्रहाची निर्मिती झाल्यामुळे या चळवळीने प्रकाशकाची निर्मिती करून देऊन ग्रंथप्रकाशन सोहळ्याचा सुद्धा विक्रमच केला आहे. प्रत्येक वर्षी 'झाडीबोली शब्दसाधक' पुरस्कार देऊन लेखकांना प्रोत्साहित करीत असतात. लेखक नवोदित लेखकांना संधी मिळावी म्हणून विविध उपक्रम राबवित असतात. झाडीबोली साहित्य चळवळीने जेव्हा रौप्य वर्षात पदार्पण केले तेव्हा वेगवेगळ्या शब्दसाधकांना झाडीबोली संमेलनाचे इतिवृत्त, संमेलनाध्यक्षांचा परिचय, संमेलनाध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांची भाषणे, शाखांच्या इतिवृत्त, झाडीबोली चळवळींची वाटचाल आदी विविध विषय निवडून संपादन कार्याचे दायित्व दिले. उपरोक्त विषयांपैकी लेखकाने स्वतःकडे 'चळवळीचे वाटचाल' हा विषय स्वच्छेने स्वीकारला




आणि त्याचे संपादन करण्यासाठी स्वतःला अक्षरशः झोकून दिले, म्हणूनच 'झाडीबोली चळवळीचे सिंहावलोकन' या ग्रंथाची निर्मिती करता आली.सदर साहित्यकृती म्हणजे वाचकांसाठी एक मौलिक ठेवाच म्हणावा लागेल कारण, लेखकाने २५ वर्षातील म्हणजे १९९१- २०१७ पर्यंत प्रत्येक महिन्यातील झाडीबोली विकसित उपक्रमांची नोंद करून मुख्य अतिथी व २५ वर्षांत झालेल्या विविध उपक्रम विषयाचे नाव देण्यात आले आहेत. त्यामुळे अभ्यासकांना सदर साहित्यकृती अभ्यासणे सोपे झाले आहे. लेखकाने नमूद केलेल्या उपक्रमांवरून प्रत्येक महिन्यात कमीत कमी दोन-तीन कार्यक्रम राबवून आपल्या बोलीचा विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर साहित्यकृती अभ्यासताना लेखकाने सामुग्रीचे संकलन करण्यासाठीअतिशय परिश्रम घेतले, हे लक्षात येते. त्यांनी संबंधितांशी वारंवार संपर्क साधणे, आपली नोकरी सांभाळून खेडोपाडी फिरून जुनी कागदपत्रे, बातम्या एकत्र करून त्याची नोंद करणे, अनेकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याशी चर्चा करणे आदी कार्य करून महत्प्रयासाने ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांना 'झाडीडीबोली चळवळीचे सिंहावलोकन' हा कलश हस्तगत करता आला आहे, असे पुस्तकाची पाठराखण करणारे डॉ. हरिश्चंद्र बोरकर म्हणतात. याशिवाय डॉ . बोरकर लेखकाचे कौतुक करताना म्हणतात की, झाडीबोलीला आपली माय मानणा-या ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर नाम या तिच्या मातृभक्त सुपुत्राने आपल्या मातेकरिता अमृतकुंभ आणणा-या गरुडाच्या निष्ठेने आणि श्रद्धेने अपार परिश्रम करून हे साध्य केले आहे. म्हणूनच सदर साहित्यकृतीच्या मलपृष्ठावर दिलेला लेखक परिचय वाचल्यानंतर त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून मिळालेल्या पुरस्कारांची यादी, त्यांची साहित्यसंपदा, विविध सन्मान यांची नोंद केली आहे. मुखपृष्ठावर तर विविध पाय-या चढून अतिशय कष्टाने लेखकाने साहित्यकृतीला आकार दिला, असे दर्शविले आहे. त्यामुळे मुखपृष्ठ पुस्तकाला दिलेल्या शीर्षकाला तंतोतंत जुळणारे झाले आहे. सदर साहित्यकृतीत काही परिशिष्ट्ये जोडले आहे. परिशिष्ट एकमध्ये झाडीबोली साहित्य मंडळ साकोली द्वारा आयोजित साहित्य संमेलनांची यादी देऊन दिनांक, स्थळ, अध्यक्ष, स्वागताध्यक्ष यांचा उल्लेख केला आहे. परिशिष्ट दोनमध्ये शाखाविस्तार, तीनमध्ये पुरस्कारप्राप्त शब्दसाधकांची सूची, चारमध्ये प्रकाशित ग्रंथसंपदा देऊन अभ्यासकांना आवश्यक त्या ग्रंथांची निवड करणे अतिशय सोपे झाले आहे. तर शेवटी डॉ. हरिश्चंद्र बोरकर लिखित झाडोबोली गौरव गीत देऊन झाडीबोलीचा इतिहास, संस्कृती सांगितला आहे. लेखकाची ही साहित्यकृती अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की, अनेक सामाजिक , शैक्षणिक संस्था उपक्रम राबवित असतात; पण त्या उपक्रमांची नोंद ठेवत नाही अथवा इतिवृत्त लिहित नाही. त्यामुळे त्या संस्थेचा इतिहास पुढील अभ्यासकांना माहिती होत नाही. लेखकाने मात्र २५ वर्षांत केलेली भ्रमंती व त्या भ्रमंतीतून बोली विकसित करण्याच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांची नोंद, ही खरोखरच प्रेरणादायी आहे. लेखकाचे केलेल्या असामान्य आणि अभूतपूर्व कार्याची नोंद केवळ झाडीबोली भाषेसाठी नव्हेतर मराठी साहित्याच्या इतिहासकारांना देखील अवश्य घ्यावी लागेल, असे त्यांचे कार्य आहे. म्हणूनच मराठी असो की झाडीबोली अभ्यासकांना त्यांची ही साहित्यकृती म्हणजे एक संदर्भ ग्रंथ म्हणून स्वतःच्या अभ्यासिकेत ठेवणे आवश्यक आहे.

प्रा.नामदेव दादाजी मोरे
९८५०५९७४८५

# गोंडवाना विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे थाटात उद्घाटन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार व्हावे : प्रकाश महाराज वाघ

**गडचिरोली | प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी १६५ ग्रंथांची साहित्य सपंदा उपलब्ध करून दिली आहे.त्यांच्या साहित्याचे वाचन हे प्रत्येकाने करायला हवे .शिक्षकांनी आपल्या कडील ज्ञान हे विद्यार्थ्यांसाठी ओतून टाकावे.स्वतःच्या चांगल्या कर्माने स्वतःची ओळख तयार करावी.सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक/सर्वधर्मीय प्रार्थनेचा आग्रहपूर्वक पुरस्कार केला.त्यांचे विचार प्रत्येक पिढी साठी कसे महत्त्वाचे आहे याबाबत त्यांनी त्यांच्या जीवन कार्याच्या अनेक पैलूवर प्रकाश टाकला .त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार व्हावे असे प्रतिपादन उदघाटक तथा मार्गदर्शक वर्धा येथील प्रकाश महाराज वाघ यांनी केले.गोंडवाना विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन आज मान्यवरांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी ते बोलत होते .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. प्रशांत बोकारे , उद्घाटक तथा मार्गदर्शक वर्धा येथील अभ्यासक तथा प्रमुख वक्ते, प्रकाश महाराज वाघ प्रमुख उपस्थिती प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे , कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, रवी भुसारी,अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष जनार्दनपंथ बोथे, गुरुदेव सेवा मंडळ गडचिरोलीचे जिल्हाध्यक्ष डॉ. शिवनाथ कुंभारे आदी उपस्थित होते.या प्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले .डॉ. शिवनाथ कुंभारे, रवी भुसारी यांनी मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक या केंद्राचे समनव्यक सा. प्रा. डॉ.विनायक शिंदे यांनी , संचालन सहाय्यक प्राध्यापक डॉ. निळकंठ नरवाडे यांनी तर आभार सहाय्यक प्राध्यापक हेमराज निखाडे यांनी मानले. या कार्यक्रमाला अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ. अनिल चिताडे,अधिष्ठाता मानव विज्ञान विद्याशाखा डॉ. चंद्रमौली यांच्यासह विद्यापीठातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी



, अध्यासन केंद्राच्या सल्लागार मंडळाचे सदस्य, सिनेट सदस्य , व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यापूर्वी गोंडवाना विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र, पंडित दीनदयाल उपाध्याय अध्यासन केंद्र , आदिवासी अध्यासन केंद्र सुरू झाले आहे.

सदर अध्यासन केंद्राच्या माध्यमातून महान व्यक्तींच्या कार्य व विचारांचा अभ्यास करण्यात येणार आहे. विद्यापीठात एकूण पाच अध्यासन केंद्र मंजूर झाले आहे. या अद्यासन केंद्राच्या सल्लागार मंडळात डॉ. नामदेव कोकडे, एडवोकेट गोविंद भेंडारकर ,गोपाळ कडू, प्रा.अशोक चरडे, सुभाष लोहे आदीचा समावेश आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महारांजाचे विचार विद्यार्थ्यांनी अंगीकारावे:कुलगुरु डॉ.बोकारे**
अध्यक्ष स्थानावरून बोलतांना कुलगुरु डॉ प्रशांत बोकारे म्हणाले , राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन करून इथेच न थांबता या उद्घाटनापासूनच आता खरं कार्य सुरू झालेलेआहे .तुकडोजी महाराजांच्या विचारांचा पगडा येथील लोकांवर आहे. महाराजांचे हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचतील . त्यांच्या विचाराने येणाऱ्या पिढीला कशी वाट दाखवता येईल. जग डिजिटल क्रांती कडे चालले आहे. त्यामुळे राष्ट्रसंतांचे विचार विद्यार्थ्यांनी अंगीकरावे असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

# उच्च दर्जाच्या तांत्रिक कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी महाज्योती आणि सिपेट संस्थांमध्ये सामंजस्य करार

## ६०० विद्यार्थ्यांना मिळणार प्लास्टिक क्षेत्रातील उच्च कौशल्य प्रशिक्षण

**गडचिरोली | प्रतिनिधी**

भारतात मोठ्या प्रमाणावर युवकांची संख्या आहे. त्यांना उच्च दर्जाचे कौशल्य विकास प्रशिक्षण दिल्यास मोठ्या औद्योगिक आस्थापनामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते. युवकांच्या कौशल्य विकास प्रशिक्षणावर भर देण्याचा शासनाचा मानस आहे. त्यातून रोजगार निर्मिती व युवक सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे, हा हेतू विचारात घेता महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील युवक-युवतींना उच्च दर्जाचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर ने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी भारत सरकारच्या केमिकल मंत्रालयाची प्रशिक्षण संस्था असलेल्या सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरीग व टेक्नोलॉजी (सिपेट), छ.संभाजीनगर या संस्थेसोबत उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी महाज्योतीने सामंजस्य करार केला आहे.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (महाज्योती) व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले व सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरीग व टेक्नोलॉजी (सिपेट), चे संचालक ए.के.राव यांनी




सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी महाज्योतीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशांत वावगे, प्रकल्प व्यवस्थापक कुणाल शिरसाठे, सीपेट संस्थेचे वरिष्ठ टेक्निकल अधिकारी मोसम चौधरी, लेखाधिकारी भारत देशमुख तसेच लेखा सहाय्यक निलेश पिंपळे आदी उपस्थित होते.सेन्ट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरीग व टेक्नोलॉजी (सिपेट), या ठिकाणी महाज्योतीच्या ६०० उमेदवारांना निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मशीन ऑपरेटर इंजेक्शन मोल्डिंग तसेच मशीन ऑपरेटर प्लास्टिक प्रोसेसिंग या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदरचे प्रशिक्षण हे मोफत व निवासी स्वरूपाचे असून ६ महिने कालावधीचे असणार आहे.सदर प्रशिक्षणात इंजेक्शन मोल्डिंग व प्लास्टिक प्रोसेसिंग याबाबतचे थेअरी तसेच प्रात्यक्षिक प्रशिक्षण अत्याधुनिक कार्यशाळेत देण्यात येणार आहे. प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी लेखा सहाय्यक निलेश पिंपळे मो.९३२५६ ८७९१० व वरिष्ठ टेक्निकल अधिकारी श्रीमती मोसम चौधरी मो.९७७७१ ३३९०३ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महाज्योती व सिपेटद्वारे करण्यात आलेले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक आपत्ती व धोके निवारण दिनानिमीत्त प्रतिज्ञा



**गडचिरोली | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे जागतिक व आपत्ती धोके निवारण दिनानिमीत्त प्रतिज्ञा घेण्याबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी धनाजी पाटील, आपत्ती व्यवस्थापन सल्लागार कृष्णा रेड्डी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी निलेश तेलतुंबडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी उमेश बर्डे, जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी शिवशंकर टेंभूर्णे, लेखाधिकारी रमेश मडावी, नायब तहसीलदार संगिता धकाते, वरीष्ठ लिपीक स्वप्निल माटे, जिल्हा नाजर आशिष सोरते, अक्षय भानारकर, विठ्ठल चहांदे, आपदा मित्र रवि कोल्हटकर, कैलाश बंकावार, आचल कोकोडे, मंगेश ठाकरे, कुलदीप शिरसाट तसेच कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत संपन्न झाला.जागतिक आपत्ती धोके निवारण दिवस साजरा करण्यासंबंधाने तसेच प्रतिज्ञा घेण्याबाबत जिल्ह्यातील सर्व कार्यालयांना जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# अहेरी नगरीत पहिल्यांदाच हास्यकल्लोळ व नृत्यांचा नजराणा

## मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या वाढदिवसानिमित्त खास कार्यक्रम

**गडचिरोली | प्रतिनिधी**

-राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री राजे धर्मराव बाबा आत्राम यांच्या २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त अहेरी राजनगरीत पहिल्यांदाच हास्यकल्लोळ व नृत्यांचा नजराणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.२० ऑक्टोबर हा दिवस म्हणजे राज्यमंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचा जन्मदिवस. दरवर्षी मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांचा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. याही वर्षी विविध सामाजिक कार्यक्रम राबवून रात्रीच्या सुमारास हास्यकल्लोळ व नृत्यांचा नजराणा या कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे.सदर कार्यक्रम स्नेहा लॉन येथील भव्य पटांगणात २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास होणार असून या कार्यक्रमाचा अहेरी विधानसभेतील तमाम जनतेने आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ओलितासाठी दिवसा ३ फेज लाईन द्या

## पालकमंत्री मुनगंटीवार यांच्या कडे सुरज धात्रक यांनी निवेदनातून केली मागणी



**वरोरा | प्रतिनिधी**

एकीकडे मोझाक या रोगाने शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक पूर्णपणे उद्वस्त झाले तर दुसरी कडे शेतकऱ्याला थ्री फेज वीजपुरवठा दिवसा नसल्यामुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. कपाशीचे पीकही उन्हामुळे सुकायला सुरवात झाली आहे. त्यामुळे सध्या स्थितीत शेतकरी द्विधा मनःस्थितीत आहे .रात्रीच्या वेळेस थ्री फेज वीज पुरवठा असला तरी जंगली जनावरांची मोठी दहशत असल्यामुळे शेतकरी भीती मुळे रात्री ओलितासाठी जाऊ शकत नाही. त्यामुळे समस्त शेतकरी बांधवांच्या वतीने दिवसा थ्री फेज वीजजोडणी पुरवठा करण्यात यावा अशा आशयाची मागणी सुरज धात्रक तालुका महामंत्री भाजपा युवा मोर्चा यांनी पालकमंत्री .ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या कडे केली आहे .

# अहेरीत नवरात्र दुर्गोत्सव विविध उपक्रमांनी साजरा होणार

**अहेरी | प्रतिनिधी**

अहेरी शहरातील दुर्गोत्सव संपूर्ण विदर्भात प्रसिद्ध आहे नवसाला पावणारी देवी म्हणून त्यात प्राप्त आहे मंडळाचे हे ४३ वे वर्षे आहे. श्री आदर्श दुर्गोस्तव मंडळ अहेरीच्या वतीने भारतातील विविध स्थळांच्या धार्मिक मंदिराच्या प्रतिकृती साकारण्यात येते अक्षरधाम मंदिर, बिर्ला मंदिर, भवानी माता मंदिर यासारख्या प्रतिकृत्या मंडळातर्फे साकारण्यात आलेल्या होत्या, संपूर्ण नवरात्र भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्रबिंदू आहे, मंडळातर्फे दरवर्षी सादर होत असलेली संगीतमय आरती संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे यावर्षी सुद्धा सामाजिक उपक्रम, आरोग्य शिबिर, ग्रामसफाई, ऑर्केस्ट्रा, देवी जागरण व समाज उपयोगी उपक्रम मंडळातर्फे राबविण्यात येत असून त्याचप्रमाणे दररोज होणारा महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम मंडळ तर्फे आयोजित करण्यात आलेले आहे. हरी शहरातील दुर्गा उत्सव हा संपूर्ण जिल्ह्यात व महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे हा दुर्गोस्तव सोहळा डोळे भरून पाण्यासाठी आजूबाजूच्या तालुक्यातील आंध्र प्रदेश तेलंगणा व छत्तीसगड या राज्यातून भाविक मोठ्या संख्येने या ठिकाणी येतात व माता चरणी आपले भाव प्रगट करतात आणि देवी त्यांची मनोकामना पूर्ण करते, सामाजिक नियमाचे पालन करून हा दुर्गोस्तव साजरा करण्यात येत असल्याची माहिती मंडळाचे प्रसिद्धी प्रमुख अशोक प्रभाकर आईंचवार यांनी दिली आहे



# राज्य अनुसूचित जमाती आयोगाच्या स्थापनेचे खासदार अशोक नेते यांचे कडून स्वागत

**गडचिरोली | प्रतिनिधी**

केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्रात अनुसूचित जमातींच्या हक्करक्षणासाठी आयोग स्थापन करण्याच्या महायुती सरकारच्या निर्णयाचे राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु. जनजाती मोर्चाचे तथा खासदार अशोक नेते यांनी स्वागत केले आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे केंद्र सरकारसोबतच राज्यातील विविध खात्यांच्या अनुसूचित जमातींकरिता असलेल्या विविध योजनांचा लाभ अनुसूचित जमातींना मिळून त्यांच्या सक्षमीकरणाचे नवे पर्व राज्यात सुरू होईल, असा विश्वास भाजपाचे खासदार अशोक नेते यांनी आज एका पत्रकाद्वारे व्यक्त केला आहे. राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या बुधवारी झालेल्या बैठकीत महायुती सरकारने आयोगाच्या स्थापनेचा निर्णय घेतला असून अनुसूचित क्षेत्रांची पुनर्रचना करण्याबाबतही सरकार सकारात्मक असल्याने, राज्याच्या कानाकोपऱ्यातील अनुसूचित जमातींच्या विकासाच्या संधी विस्तारल्या आहेत. अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद, आदिवासी जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यात प्रकल्प कार्यालये, आणि क्षेत्रविस्तारात नव्या गावांचा समावेश करण्यात येणार असल्याने, अनुसूचित जमातींकरिता असलेल्या निधीचा पुरेपूर प्रामाणिक वापर होईल, अशी माहिती खासदार अशोक नेते यांनी दिली.अनुसूचित जमातींच्या विकासाकरिता जवळपास प्रत्येक खात्याकडून स्वतंत्र योजना व निधीची तरतूद केली जाते, पण नियोजन किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे त्याचा वापर होत नसल्याने ही तरतूद व्यपगत होते व योजना असूनही अनुसूचित जमातींना




त्यांच्या लाभापासून वंचित रहावे लागते. नवा आयोग या योजना अनुसूचित जमातींपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्वाची भूमिका बजावेल, तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा समन्वय आणि प्रसंगी अनुसूचित जमातींच्या कल्याण योजनांबाबत सल्लागाराची महत्वाची भूमिका बजावेल असा विश्वास व्यक्त करून खासदार अशोक नेते यांनी या निर्णयाबद्दल महायुती सरकारचे अभिनंदन केले आहे. जाती आधारित भेदभावाची दरी दूर करण्यासाठी प्रयत्न करणे, घटनेने दिलेल्या समान अधिकारांच्या हक्कांची जाणीव प्रबळ करण्याकरिता अनुसूचित जमातींमध्ये शैक्षणिक प्रसार करणे, आर्थिक विकासाच्या योजना आखून सरकारला सादर करणे, राजकीय सहभागाकरिता जनजागृती करणे आदी बाबींमध्ये अनुसूचित जमाती आयोग महत्वाची भूमिका बजावतो, अशी माहिती ही खासदार अशोक नेते. यांनी दिली. अनुसूचित जाती, जमातींच्या विकासासाठी राज्यातील महायुती सरकार नेहमीच संवेदनशील असते. या आयोगामुळे आता विकासाच्या प्रक्रियेस वेग येईल, असा विश्वास खा.अशोक नेते यांनी व्यक्त केला

# शेगाव (बु) येथे मस्कऱ्या गणेशाचे थाटात विसर्जन

# शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडेसह शिवसैनिकांनी केला गणेश मंडळांचा स्वागत सत्कार









**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेगांव (बू) येथील मस्कऱ्या गणेश मंडळाच्या वतीने भव्य मिरवणूक काढून डी जे तसेच ढोल ताश्याच्या गजरात मस्कऱ्या गणपत्ती बाप्पाला अखेरचा निरोप देण्यात आला. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सर्व गणेश मंडळाचे तसेच गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी आलेल्या भाविक भक्तांचे स्वागत करण्यासाठी स्वागत मंच उभारून छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

स्थानिक शेगाव बू येथे दरवर्षी मस्कऱ्या गणपती बाप्पाचे विसर्जन मोठ्या उत्साहाने थाटात होत असून येथील विसर्जन मिरवणूक वरोरा तालुक्यात प्रसिद्ध आहे. येथील प्रत्येक मस्कऱ्या गणेश मंडळांकडून आपले गणेश मंडळ सर्वाधिक सुशोभित कसा दिसेल या कडे प्रत्येक मंडळाचे अधिक लक्ष असते तेव्हा सर्वस्वी मंडळ डीजे , ढोल ताशे , फटाक्याची आतषबाजी , सुशोभित देखावे , अश्या अनेक उपक्रमाने शेगाव नगरी तसेच परिसरातील नागरिकांचे मने मोहून टाकतात. या मिरवणुकीदरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्यासह युवासैनिक तसेच शिवसैनिकांनी विसर्जन मिरवणुकीत सामील सर्व मस्कऱ्या गणेश मंडळ सदस्य व गानपत्ती बाप्पाला अखेरचा निरोप देण्यासाठी आलेल्या भाविक भक्तांच्या स्वागत करण्यासाठी स्वागत मंच उभारण्यात आला होता. याप्रसंगी सर्व गणेश मंडळांचा शाल श्रीफळ तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शेगाव येथील उपसरपंच साधना मानकर, उपजिल्हाप्रमुख अमित निब्रड, युवा सेना जिल्हा समन्वयक तथा माजी नगरसेवक दिनेश यादव, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, उपतालुकाप्रमुख राजू राऊत, युवा सेना तालुकाप्रमुख ओमकार लोंढे , शहर प्रमुख अक्षय झिले, विभाग प्रमुख रवी वाटकर, होमराज घुमे, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल वाढई, कपिल राऊत, दादापूर ग्रामपंचायत सदस्य दिलीप बोधाने, तंटामुक्ती अध्यक्ष संदीप चौधरी, उपशहर प्रमुख मनीष दोहतरे, अभी अभी रुयारकर, युवा सेना शहर प्रमुख अनिकेत हिवरे तथा समस्त युवा सैनिक , महिला आघाडी सदस्य, युवतीसेना सदस्य, आजी माजी पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## सोलापुर जिल्हा मध्यवर्ती बँक फोडण्याचा चोरटयांचा अयशस्वी प्रयत्न




**मोहोळ –** घराला लावलेला कडी कोंयंडा तोडून आज प्रवेश करून आतील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून, आतील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व बँकेची कागदपत्रे असा ९० हजाराचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला.दरम्यान चोरटयांनी गावातीलच जिल्हा मध्यवर्ती बँकेची शाखा फोडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला, तसेच बँकेसमोरील एका किराणा दुकानाचा कडी कोयंडा तोडुन आतील पाचशे रुपयांची रोकड व एक मोटरसायकल असा एकूण एक लाख वीस हजार पाचशे रुपयाची चोरी झाल्याची घटना कुरूल ता. मोहोळ येथे गुरुवार ता १२ रोजी रात्री पावणेदोन वाजता घडली. दरम्यान पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केले होते, मात्र काहीही हाती लागले नाही.या संदर्भात कामती पोलिसांकडून मिळालेल्या माहिती नुसार, कुरूल येथील रहिवासी ज्ञानेश्वर मारुती माने (वय-४७) हे शेतात राहतात. त्यांचे गावात घर आहे. बुधवार ता. ११ रोजी घराला कुलूप लावून ते शेतात गेले होते. दरम्यान गुरुवारी रात्री पावणेदोन वाजता ज्ञानेश्वर यांना त्यांचा पुतण्या भैरवनाथ माने यांनी फोन केला. व तुझ्या घराचा दरवाजा उघडा दिसत आहे, तू लवकर ये, असे सांगितले.ज्ञानेश्वर यांनी घरी येऊन पाहिले असता दरवाजा उघडाच होता, तसेच घरातील लोखंडी कपाटाचाही दरवाजा तोडलेला दिसला. तपासणी केली असता कपाटातील सोन्याची अंगठी, मणी मंगळसूत्र, गंठण, चांदीची जोडवी मासोळ्या व रोख रक्कम २० हजार रुपये चोरीला गेल्याचे निदर्शनाला आले.चोरटे एवढे करून थांबले नाहीत, तर त्यांनी कुरुल येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या दरवाजाचा कडी कोयंड़ा कापून आत प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न केला. तिजोरीला हात न लावल्याने सायरन वाजला नाही.दरम्यान बँकेसमोर असलेले सज्जन मौला तांबोळी यांच्या दुकानाचा कडी कोयंडा उचकटून दुकानातील पाचशे रुपये व एम एच १३ सीसी ५७३ ही तीस हजार रुपयाची मोटरसायकल चोरून नेली. या संदर्भात ज्ञानेश्वर माने यांनी फिर्याद दिली असुन अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे करीत आहेत.

## 'महाविकास आघाडी सरकारच्या काळातच उद्धव ठाकरेंची भाजप सोबत जाण्याची तयारी'–तटकरे

**मुंबई–**उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना म्हणजेच महाविकास आघाडीचे सरकारच्या कार्यकाळातच उद्धव ठाकरे यांची भारतीय जनता पक्षासोबत सरकार बनविण्याची तयारी होती, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांनी केला आहे. ही माहिती आम्हाला तेव्हाच उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनीच दिली होती, असा दावाही सुनील तटकरे यांनी केला आहे.उद्धव ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या 'सामना' दैनिकातून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविषयी सातत्याने



वाईट लिहून येत आहे. यावरुन सुनील तटकरे यांनी उद्धव ठाकरे गटावर सडकून टीका केली आहे. यातच त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या भाजपसोबत जाण्याच्या तयारीचा उल्लेख करत हा दावा केला आहे.मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीमधील नेत्यांच्या शिष्टमंडळासोबत राज्यातील काही विषयांवर चर्चा करण्यासाठी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यास गेले होते. या भेटीनंतर ठाकरे यांच्या मनात भाजप सोबत जाऊन सरकार बनविण्याचा विचार सुरु झाला होता, असा दावा सुनील तटकरे यांनी केला आहे. इतकेच नाही तर या बैठकीनंतर खासदार संजय राऊत यांनीच अजित पवार यांच्यासोबत झालेल्या बैठकीत याबाबत आम्हाला माहिती दिली होती, असा दावा तटकरे यांनी केला आहे. या बैठकीला एकनाथ शिंदे, तसेच मिलिंद नार्वेकर हे देखील उपस्थित होते, असेही सुनील तटकरे यांनी सांगितले.महिला आरक्षण विधेयक संसदेत मांडले जात असताना अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे हे एका उद्योगपतीच्या घरी आरती करण्यात व्यग्र होते, असा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला होता. सुप्रिया सुळे यांच्या या टीकेलाही सुनील तटकरे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांचे संपूर्ण आयुष्य उद्योगपतींच्या घरच्या आरत्या करण्यात गेले त्यांनी मी केलेल्या आरती संदर्भात बोलू नये, असा टोला सुनील तटकरे यांनी लगावला आहे.

## हायकोर्टाने रवींद्र वायकरांची याचिका फेटाळली:विकास निधी वाटपात दुजाभाव केल्या प्रकरणात राज्य सरकारला दिलासा

**मुंबई–**ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांना हायकोर्टाने दणका दिला आहे. राज्यातील आमदारांच्या विकास निधी वाटपात राज्य सरकार दुजाभाव करत असल्याचा वायकर यांनी याचिकेतून केला होता. रवींद्र वायकर यांची याचिका हायकोर्टाने फेटाळली आहे.या प्रकरणी हायकोर्टाकडून शिंदे सरकारला मोठा दिलासा दिला देण्यात आला आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती सुनील शुक्रे, न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या द्विसदस्य खंडपिठाने याप्रकरणी निर्णय दिला. याचिका गुणवत्तेच्या आधारावर कमकुवत असल्याचे हायकोर्टाने म्हटले आहे.नव्या आर्थिक वर्षात कुठल्याही आमदारला निधीचे वाटप करण्यास हायकोर्टाने स्थगिती उठवत हायकोर्टाने यासंदर्भात ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे. गेल्या आर्थिक वर्षात कोणत्या आमदाराला किती निधी दिला? आणि तो कोणाच्या खात्यात जमा केला? याचे तपशील याप्रकरणी हायकोर्टात सादर करत निधी नियोजित कामांसाठीच दिल्याचे स्पष्टीकरण हायकोर्टात देण्यात आले आहे. शिंदे - फडणवीस सरकारला हा निकाल एक मोठा दिलासा आहे.विधानसभा आणि विधान परिषदेच्या प्रत्येक सदस्याला स्थानिक विभागातील विकासासाठी जिल्हा नियोजन आयोगामार्फत एमएलडी निधीचे वाटप होते. त्यानुसार, झोपडपट्टीतील रहिवाशांचे पुनर्वसन, पालिकांमार्फत पायाभूत सुविधांचा विकास अशा विविध कामांसाठी निधीचे वाटप करण्यात आले आहे. राज्य सरकार आणि महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणच्या (म्हाडा) वर्ष २०२२-२३ झोपडपट्टीतील रहिवाशांच्या पुनर्वसन योजनेसाठी ११ हजार ४२०.४४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. ज्यामध्ये २६ हजार ६८७.२ लाख रुपये मागासवर्गीय व्यतिरिक्त इतर झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी आणि ७ हजार लाख मुंबई उपनगर जिल्ह्यातील पायाभूत सुविधांच्या विकासांच्या कामासाठी निधीची वाटणी करण्यात आली होती. मात्र, हा निधी प्रामुख्याने भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना (शिंदे गट) आणि रिपब्लिक पक्ष या सताधारी पक्षाच्या आमदारांच्या मतदारसंघांना मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आला आहे. आपल्या मतदारसंघात अनेक झोपडपया असून तिथेही पायाभूत नागरी सुविधांची गरज आहे. परंतु, आपल्यासह पक्षातील इतर सदस्यांनाही त्यांच्या मतदारसंघासाठी निधी नाकारण्यात आल्याचा आरोप याचिकेतून करण्यात आला होता.

# न्यू इंग्लिश स्कूल ची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

न्यू इंग्लिश स्कूल ची सन २०२३-२४ ची प्रथम सत्रातील एकदिवसीय सहल दि १०/१०/२०२३ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यामध्ये गोंदवले सातारा,वाई,पाचगणी,महाबळेश्वर इत्यादी ठिकाणी भेटी देण्यात आल्या. सदर शैक्षणिक सहलीसाठी न्यू इंग्लिश स्कूल मधील इयत्ता पाचवी ते दहावी मधील २८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तर विद्यार्थ्यांसोबत २० शिक्षक सोबत होते. मंगळवार १० ाक्टोंबरच्या सकाळी गोंदवलेकर महाराजांच्या दर्शनाने सहलीची प्रसन्न सुरूवात झाली. त्यानंतर वाई मधील गणपती अळीच्या घाटावर असलेल्या हेमाडपंथी शैलीतील ढोल्या गणपती मंदिराला भेट देवुन दर्शन घेतले. वाई मध्ये अनेक मंदिरे आहेत. त्यातील महत्त्वाचे म्हणजे ढोल्या गणपती मंदिर. मंदिरातील १० फूट उंच आणि ८



फूट रूंदीची गणेश मूर्ती अतिशय विलोभनीय आहे आणि ती अखंड कातळातून कोरली गेली आहे. वाई गणपती मंदिरानंतर सहल पुढे पाचगणीच्या घाटातील मनमोहक सह्याद्रीच्या डोंगर रांगा पाहत पुढे महाबळेश्वरकडे रवाना झाली. दुपारी महाबळेश्वर मध्ये पोहचल्यानंतर पारसी पॉईंट येथील गार्डन मध्ये सर्व विद्यार्थांनी एकतित्रपणे स्नेहभोजनाचा आनंद लुटला व नंतर महाबळेश्वर दर्शनाला प्रारंभ झाला. सुरूवातीला महाबळेश्वराच्या मंदिरातून कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री व गोवित्री या पाच नद्या उगम पावतात. येथे पंचगंगेचे देऊळ आहे.हे ठिकाण क्षेत्र महाबळेश्वर म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणी भेट देण्यात आली. त्यानंतर जवळच असलेल्या कृष्णाबाई मंदिरास भेट देण्यात आली. या ठिकाणी मंदिरात शिव लिंग आणि कृष्णाची मूर्ती आहे. लहानसा ओहोळ गोमुखातून वाहतो आणि तो पाण्याच्या कुंडात पडतो. पूर्ण मंदिराचे छतासह दगडी बांधकाम हे विशेष वैशिष्ट्य आहे. त्यानंतर आर्थर सीट पॉइंट,मंकी पॉईंट,केटस् पॉईंट,एलीफंट हेड पॉइंट,विल्सन पॉइंट,सनसेट पॉईंट इत्यादी ठिकाणी भेटी देवुन विद्यार्थांनी विहंगम अशा नैसर्गिक ठिकाणांचा मनमुराद आनंद लुटला. याठिकाणी विद्यार्थ्यांची सेल्फी,फोटोंसाठी लगबग पहायला मिळाली. अविनाश सरगर यांनी सहलींचे सुंदर क्षण कॅमेराबद्ध केले. शेवटी महाबळेश्वरच्या बाजारपेठेतील मनसोक्त खरेदीने सहल सांगोला कडे रवाना झाली. मुख्याध्यापक प्रा.हेमंतकुमार आदलिंगे व उपमुख्याध्यापक प्रा नामदेव कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहल प्रमुख श्री दशरथ जाधव ,पर्यवेक्षक तानाजी सूर्यागंध ,दत्तात्रय पांचाळ ,औदुंबर कांबळे ,तात्यासाहेब इमडे ,वैशाली घोडके मॅडम,श्रीरंग बंडगर ,कोमल भंडारे मॅडम,राणी आदलिंगे ,दिप्ती कुलकर्णी ,चैतन्य फुले ,अमोल पाकले ,मुजावर,रेश्मा खडतरे , स्मिता देशमुख व हजारे यांनी सदर सहल यशस्वीपणे पार पाडली.सदरची सहल नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वी पार पाडल्याबद्दल संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे ,संचालक डॉ.अशोकराव शिंदे ,दिपक खटकाळे व जयंत जानकर यांनी विशेष कौतुक केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .